## इमारतीचे निर्लेखन

जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत विविध विभागाकडील मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीचे निर्लेखनाचे प्रस्ताव संबधीत विभागाकडून इमारतीचे मालकी हक्काचे अभिलेख, इमारत बांधकामाचे वर्ष, इमारतीची किंमत, इमारतीच्या चारही बाजेचे रंगित फोटो जोडून बांधकाम विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर शासन परिपत्रक क्र.जिपई-2012/प्र.क्र.118/पंरा-7 ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दि.09 जानेवारी 2012 मधील निर्देशाअन्वये इमारतीचे पाहणी अहवालाचे विहीत प्रपत्र, प्रमाणपत्र, इमारतीची घसारा किंमत व इमारत बांधकामाच्या दर्जा बाबत कार्यकारी अभियंता (बां) व संबधीत विभागाचे विभाग प्रमुख यांनी संयुक्त तपासणी करुन पाहणी अहवाल प्रस्तावा सोबत जोडून मा. अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ किंवा मा. अधिक्षक अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांचे कार्यालयाकडे सादर करण्यात येते.

त्यानंतर संबधीत यंत्रणे कडुन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने जिल्हा परिषद सर्व साधारण सभेने मान्यता प्रदान केले नंतर इमारत निर्लेखन करणेसाठी ईमारतीशी संबधीत विभागाच्या खाते प्रमुखांना कळविण्यात येते.संबधीत खाते प्रमुख यांचे मार्फत शासन पुरक परिपत्रक क्र.जिपई-2011/प्र.क्र.198/पंरा-7 ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दि.08 जून 2012 मधील अधिकारानुसार इमारत निर्लेखन करणे साठी आदेश निर्गमीत करण्यात येवून इमारतीचे निर्लेखन संबधित विभागाकडुन करण्यात येते.